<u>**शुभमंगल सामुहिक/ नोंदणीकृत विवाह योजना**</u>

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग यांचे मार्फत शेतकरी / शेतमजूराच्या मुलीच्या सामुहिक / नोंदणीकृत विवाहासाठी आवश्यक मंगळसुत्र व इतर वस्तूची खरेदी करण्यासाठी प्रती जोडपे रुपये १०,०००/- एवढे अनुदान देण्यात येते.

शुभमंगल सामुहिक योजनेची व्याप्ती वाढवून, ती केवळ शेतकरी /शेतमजूर यांच्यासाठी न ठेवता,अनुसुचित जाती /अनुसुचित जमाती /विमुक्त जाती /भटक्या जमाती / विशेष मागास प्रवर्ग वगळता रुपये एक लक्षपेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या निराधार / परित्यक्ता आणि विधवा महिलांच्या केवळ दोन मुलीच्या विवाहाकरीता अटी / शर्तीनुसार अनुदान मंजुर करण्यात येते.

<u>**शुभमंगल सामुहिक विवाह सोहळयाची योजना,स्थानिक स्वराज्य संस्था किंवा संस्था नोंदणी अधिनियम १८६० व सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेमार्फत राबविण्यात येईल.**</u>

<u>सदर योजनेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील.</u>

१) वधू व वर हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.

२) विवाहावेळी वधूचे वय १८ वर्ष व वराचे वय २१ वर्ष पुर्ण असावे.

३) वधू वरांना प्रथम विवाहासाठी हे अनुदान देय असेल,तथापि वधू विधवा किंवा घटस्फोटीत असल्यास तिच्या पुर्नविवाहासाठी अनुदान देय असेल.

४) लाभार्थी हा शेतकरी असल्याचा पुरावा म्हणून ७ /१२ चा उतारा

५) लाभार्थी हा शेतकरी / शेतमजूर असल्याचा पुरावा म्हणून तलाठी /ग्रामसेवक यांचा दाखला.

६) लाभार्थ्याच्या पालकाचे सर्व मार्गाने मिळणारे उत्पन्न रुपये १,००,०००/- च्या आत असावे.

**७) सदर योजनेंतर्गत अनुदान मंजुरी मिळण्यासाठी अ.जा. /अ.जमाती /वि.ज. /भ.ज. / वि.मा.प्र. या प्रवर्गातील दांपत्ये पात्र राहणार नाहीत.**

८) बालविवाह प्रतिबंधक कायदा व हुंडा प्रतिबंधक कायद्यांतर्गत असलेल्या कोणत्याही कलमाचा भंग या दाम्पत्य कुटुंब यांचेकडून झालेला नसावा.

९) सामुहिक विवाह सोहळयासाठी किमान ५ व जास्तीत जास्त १०० दाम्पत्य असणे आवश्यक आहे.

सामुहिक विवाह सोहळयाचे आयोजन करणा-या स्वयंसेवी संस्थेने /स्थानिक स्वराज्य संस्थेने सामुहिक विवाह सोहळयात भाग घेतलेल्या जोडप्यांना विवाह झाल्यापासून एक महिन्याच्या आत, निबंधक विवाह नोंदणी याचे प्रमाणपत्र मिळवून द्यावे. विवाह सोहळयात भाग घेतलेल्या जोडप्यांचे विवाह नोंदणी पत्र सादर केल्याशिवाय लाभार्थी अनुदान मिळण्यास पात्र असणार नाहीत.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील सामुहिक विवाह सोहळा राबवू इच्छिणा-या स्वयंसेवी संस्थांनी तसेच नोंदणीकृत विवाह केलेले व विधवांच्या मुली यांनी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग ,प्रशासकीय इमारत तळमजला,ए- विंग,दालन क्रमांक १०६, दूरध्वनी क्रमांक ०२३६२-२२८८६९ यांचेशी संपर्क करण्याचे आवाहन श्री.संतोष भोसले,जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सिंधुदुर्ग यांनी केले आहे

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी
सिंधुदुर्ग

# स्वयंरोजगार योजनेखाली महिलांना व्यक्तीगत अनुदान.

योजनेचे स्वरुप :- सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शहरी भागातील अनुसुचित जातीतील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील महिलांना खाद्यपदार्थ तयार करुन विकणे,मण्याच्या वस्तू विकणे,भाजीपाला व फळे विकणे,नारळ विक्री,काथ्थ्यापासून तयार केलेल्या वस्तू विकणे इत्यादी व्यवसाय करण्यासाठी मदत म्हणून रुपये ५००/- (पाचशे रुपये) इतके अनुदान जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग यांचे कार्यालयामार्फत खालील अटी व शर्तीवर मंजूर करण्यात येते.

**योजनेच्या अटी व शर्ती :**

१) लाभधारक महिलेचे महाराष्ट्रातील वास्तव्य १५ वर्षापेक्षा कमी नसावे.

२) लाभधारक महिलेच्या कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न आर्थिकदृष्टया मागासवर्गीयाकरीता शासनाने ठरवून दिलेल्या उत्पन्नापेक्षा जास्त नसावे. तथापि सर्वसाधारण योजनेंतर्गत अनुदान प्राप्त नसल्यामुळे फक्त अनुसूचित जातीतील महिलांनीच अर्ज करावेत.

३) लाभधारकास या योजनेखालील अनुदान तिच्या हयातीत फक्त एकदाच अनुज्ञेय राहील.

४) या योजनेखालील अनुदान निराधार, परित्यक्ता, विधवा अथवा नैतिक संकटात सापडलेल्या महिलांनाही अनुज्ञेय राहील.

५) या योजनेच्या संदर्भात तहसिलदार,खासदार,आमदार, नगरसेवक, विशेष कार्यकारी अधिकारी, तथा ग्रामपंचायत सरपंच यांनी प्रमाणीत केलेला उत्पन्नाचा दाखला ग्राह्य धरण्यात येईल.

या योजनेखालील अनुदानासाठी विहीत नमुन्यात जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय,प्रशासकीय इमारत, ए-विंग, दालन क्रमांक १०६,सिंधुदुर्गनगरी या कार्यालयाकडे अर्ज सादर करावेत.अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय,दुरध्वनी क्रमांक ०२३६२-२२८८६९ यावर संपर्क करण्याचे आवाहन श्री.संतोष भोसले,जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, सिंधुदुर्ग यांनी केले आहे.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी,
सिंधुदुर्ग